पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
माजसं/२/कावि/३५८/२०१९
दि.१३/०८/२०१९

# परिपत्रक

## विषय- जाहिरात रोटेशन धोरण सन २०१९-२० बाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शासन मान्य यादीवर असणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य दराने जाहिराती देणेत येतात. यामध्ये अ, ब, व क वर्ग वृत्तपत्रांचा समावेश आहे. शासनमान्य दराने जाहिरात प्रसिध्द करणाऱ्या खालील वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास तसेच रोटेशन ड व ई मधील वृत्तपत्रांना त्यांनी दिलेल्या सवलतीच्या दराने जाहिरात वितरित करण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र. ५१२७ दि.३१/०७/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर रोटेशनची मागणी करताना पत्रामध्ये निविदा रक्कमेचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात यावा.

**रोटेशन (अ) - एका कामाची निविदा २ कोटी पर्यंत असल्यास-**

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | दर प्रति चौ.सें.मी. |
|---|---|---|
| १ | दै.पुढारी | १२८/- |
| | दै.पुणे जिल्हा सांज समाचार | २८/- |
| | दै.कातिब | १७/- |
| | सा.पिंपरी चिंचवड पवनेचा प्रवाह | ६/- |
| | सा.काय चाललंय | ६/- |
| | | |
| २ | दै.लोकमत | ९०/- |
| | दै.लोकमंथन | १६/- |
| | दै.सिध्दांत समाचार | १६/- |
| | सा.पुरोगामी विचारांची झुंज | ५/- |
| | | |
| ३ | दै.पुण्यनगरी | ५६/- |
| | दै.बहुजनरत्न लोकनायक | ३४/- |
| | दै.विश्वदर्पण | १६/- |
| | सा.माझी सखी सोबती | ६/- |
| | सा.जनप्रेम | ६/- |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ४ | दै.लाईफ ३६५ | ५०/- |
| | दै.संध्या | ३५/- |
| | दै.सांज महानगरी | ३३/- |
| | दै.पवना समाचार | २७/- |
| | सा.प्रगत भारत | ७/- |
| | | |
| ५ | दै.नवभारत | ५०/- |
| | दै. नवराष्ट्र | ४३/- |
| | दै.लोकमान्य सांजवार्ता | ३३/- |
| | दै.लोकटाईम्स | २०/- |
| | सा.कात्रजच्या बोगदयातून | १९/- |
| | | |
| ६ | दै.सामना | ६८/- |
| | दै.बिझनेस स्टँडर्ड | २३/- |
| | दै.महाराष्ट्र निरोप्या | १६/- |
| | दै.जनमंथन | १६/- |
| | सा.क्रांतीप्रकाश | ६/- |
| | | |
| ७ | दै.आज का आनंद | ५२/- |
| | दै.दिवस रात्री | १९/- |
| | दै.पिंपरी चिंचवड समाचार | १८/- |
| | दै.विश्वेश्वर | १६/- |
| | सा.सहारा | ९/- |
| | | |
| ८ | दै.लोकसत्ता | ६१/- |
| | दै.केसरी | ५०/- |
| | दै.बंधुप्रेम | १७/- |
| | दै.दायित्व | १६/- |
| | सा.पुष्पप्रकाश | ७/- |
| | | |
| ९ | दै.सकाळ | १८०/- |
| | दै.संध्यानंद | ७२/- |
| | दै.राष्ट्रतेज | २६/- |
| | दै.नवीन संध्या | १६/- |
| | सा.नव्या समाजाची चाहुल | ७/- |
| | | |

| | | |
|---|---|---|
| १० | दै.महाराष्ट्र टाईम्स | १३२/- |
| | दै.प्रभात | ४३/- |
| | दै.भारत डायरी | १६/- |
| | सा.बृहन्न वार्ता | ७/- |
| | सा.समाज गर्जना | ६/- |

**रोटेशन (ब) - का कामाची निविदा २ कोटी पुढील ते ७ कोटी पर्यंत** असल्यास तसेच महापालिकेची नोकर भरती, मानधनावरील नियुक्ती इ. च्या जाहिराती खालील वृत्तपत्रांस राज्यस्तरावर देण्यात याव्यात.

विविध विभागातील योजना, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रिया, विविध कोर्सेस तसेच नगररचना विभागाकडील सर्व जाहिराती, जाहीर नोटीस इत्यादी विषयक जाहिराती शासनमान्य दराने स्थानिकस्तरावर वृत्तपत्रास देणेत यावी.

१) दै. सकाळ X दै.आज का आनंद

२) दै.महाराष्ट्र टाईम्स X दै.पुण्यनगरी X दै.प्रभात

३) दै.पुढारी X दै.लोकसत्ता X दै. नवभारत

४) दै.लोकमत X दै.केसरी X दै.सामना

**रोटेशन (क) – मा. महापालिका सभेची नोटीस स्थानिक वर्तमानपत्र दै. पवना समाचार मध्ये प्रसिध्द करणेत यावी.**

**रोटेशन (ड) – एकाच कामाची निविदा र.रु. ७ कोटीच्या पुढे असल्यास सदर जाहिरात राज्यस्तर व देशस्तरावर** खालील वृत्तपत्रात करारनामा न करता आकारमान निश्चित करुन जाहिराती देवून जाहिरातींचे बिल त्यांच्या सवलतीच्या दरानुसार देण्यात यावे.

१. दै. पुढारी X दै. जागरण

२. दै. सकाळ X दै. भास्कर

३. दै. पुण्यनगरी X दै. हिंदुस्तान X दै. हिंदुस्तान टाईम्स

४. दै. महाराष्ट्र टाईम्स X दै. नवभारत टाईम्स X दै.टाईम्स ऑफ इंडिया X दै. नवभारत

५. दै. लोकसत्ता X दै. इंडियन एक्सप्रेस X दै. न्यू इंडियन एक्सप्रेस

६. दै. लोकमत X दि हिंदू + बिझनेस लाईन X दै. बिझनेस स्टॅंडर्ड

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नांव | पुणे आवृत्ती दर प्रती चौ.सेमी | | राज्यस्तर (महाराष्ट्र) दर प्रती चौ.सेमी ०१.०४.२०१९ पासून लागू | देशस्तर (भारत) दर प्रती चौ.सेमी. ०१.०४.२०१९ पासून लागू |
|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय ०१.०१.२०१९ पासून लागू | सवलतीचे ०१.०१.२०१९ पासून लागू | | |
| १ | दै.लोकसत्ता | ६१/- | - | १९५०/- | - |
| २ | दै.इंडियन एक्सप्रेस | - | ५५०/- | १८५०/- | २५५०/- |
| ३ | दै.लोकसत्ता + दै.इंडियन एक्सप्रेस | - | ६११/- | २७००/- | ३१००/- |
| ४ | दै.महाराष्ट्र टाईम्स | १३२/- | - | १४९३/- | - |
| ५ | दै. टाईम्स ऑफ इंडिया + पुणे मिरर (सर्व आवृत्तींकरिता) | | ६५७/- | २९९५/- | ५३३६/- |
| ६ | दै.महाराष्ट्र टाईम्स + दै. टाईम्स ऑफ इंडिया + नवभारत टाईम्स + पुणे मिरर (सर्व आवृत्तींकरिता) | | ७८९/- | ३६५१/- | ६२२८/- |
| ७ | दै. बिझनेस स्टॅंडर्ड | २३/- | - | ५७५/- | १५६५/- |
| ८ | दै. हिंदुस्तान टाईम्स + दै. मिंट | | ४००/- | १९००/- | ४६००/- |
| ९. | दै. हिंदुस्तान टाईम्स +दै. हिंदुस्तान + दै. मिंट | - | - | - | ७,८००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | दै. दि हिंदू + बिझनेस लाईन | - | - | ४००/- | ४१००/- |
| ११ | दै. लोकमत | ९०/- | - | ३०००/- | - |
| १२ | दै. सकाळ | १८०/- | - | २१००/- | - |
| १३ | दै. पुढारी | १२८/- | - | १९००/- | - |
| १४ | दै. पुण्यनगरी | ५६/- | - | १४००/- | - |
| १५ | दै.दि न्यू इंडियन एक्स्प्रेस + दै. मोर्निंग स्टँडर्ड | - | - | - | २५००/- |
| १६ | दै.जागरण | - | - | - | ९५००/- |
| १७ | दै.आज का आनंद | ५२/- | - | ३००/- | - |
| १८ | दै. नवभारत | ५०/- | - | १०००/- | - |
| १९ | दै. भास्कर | - | - | - | ९३००/- |

**धोरणात्मक बाबी व अटी - शर्ती**

**१)** मनपाच्या जाहिरातीसाठी जो क्रमांक चालु असेल ते रोटेशन स्विकारावे लागेल.

**२)** माहिती व जनसंपर्क विभागाकडून जाहिरात रोटेशन घेतल्या शिवाय परस्पर वृत्तपत्रांना जाहिराती देण्यात येवू नयेत.

**३)** माहिती व जनसंपर्क विभागाकडून रोटेशन प्राप्त झालेनंतर, सदरची जाहिरात विनाविलंब संबंधित वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दिस देण्यात यावी. तसेच संबंधित विभागाने निविदा किंवा इतर जाहिरात यांचे मुख्य शिर्षक उदा. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हा फॉन्ट साईज १४, स्थापत्य विभाग हा फॉन्ट साईज ११ तर निविदा सुचना क्र. १/२०१८-१९ हा फॉन्ट साईज ९.५ तसेच इतर मजकुराचा उदा. निविदा अटी शर्ती व कामाची नावे ९.५ या फॉन्ट साईज मध्ये छापणेस तसेच इंग्रजी वृत्तपत्रे यांना अनुक्रमे १४,११,८.५ व ८.५ या फ़ॉन्ट साईझ प्रमाणे जाहिरात छापणेस वृत्तपत्रांना कळविण्यात यावे.

**४)** माहिती व जनसंपर्क विभागाकडून प्राप्त झालेल्या रोटेशननुसार ज्या वृत्तपत्रांने कमीत कमी आकारमानात जाहिरात प्रसिध्द केली असेल त्या वृत्तपत्राच्या आकारमानानुसार इतर वृत्तपत्रांना बिले अदा करण्यात यावीत.

**५)** रोटेशन 'अ' नुसार निविदेमध्ये एकापेक्षा जास्त कामे ही र.रू. २ कोटीपर्यंत असल्यास तसेच रोटेशन 'ब' नुसार एक किंवा जास्त कामे २ कोटीपेक्षा जास्त परंतु

७ कोटीपर्यंत असल्यास त्यासाठी एकच रोटेशन न घेता रोटेशन 'अ' व रोटेशन 'ब' साठी स्वतंत्र रोटेशन घेण्यात यावे.

**६)** म.न.पा. रोटेशन यादीवरील वृत्तपत्रांनी विहित मुदतीमध्ये जाहिरात प्रसिद्ध करावी. विहित मुदतीनंतर वृत्तपत्रांनी जाहिरात छापल्यास प्रतिदिन र.रु. १००/- विलंब शुल्क संबधित जाहिरातीच्या बिलातून वजा करण्यात यावी.

**७)** संबंधित विभागांनी जाहिरात मसूदा सायं. ४.०० वा पर्यंत संबंधित वृत्तपत्रांना समक्ष अथवा ई-मेलद्वारे पाठवण्यात येऊन भ्रमणध्वनीद्वारे जाहिरात मिळाल्याची खातरजमा करावी.

**८)** राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रांचा जाहिरातीचा मसूदा केवळ हिंदी अथवा इंग्रजी भाषेमध्येच प्रसिद्ध करावा.

**९)** रोटेशन प्राप्तीनंतर संबंधित विभागाने वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्धीसाठी न दिल्यास त्याची कारणे मा. आयुक्त अथवा मा. अतिरिक्त आयुक्त यांचेकडे त्वरित सादर करावी व मान्यतेनंतर त्याची एक प्रत माहिती व जनसंपर्क विभागाकडे सादर करावी.

**१०)** जाहिरात प्रसिध्द झालेपासून १५ दिवसात वृत्तपत्रांनी संबंधित विभागाकडे जाहिरात बिले सादर करावीत. त्यानंतर सादर केलेल्या वृत्तपत्रांची जाहिरात बिले स्वीकारण्यात येणार नाहीत तसेच अदायगीस प्राप्त राहणार नाहीत. संबंधित विभागांनी जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसात प्राप्त झालेल्या वृत्तपत्रांची बिले अदायगीची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी.

**११)** महापालिकेचे बोधचिन्ह व जाहिरात क्रमांक जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्याच्या सूचना संबंधित वृत्तपत्रांना देण्यात याव्यात. मनपाचे बोधचिन्ह/जाहिरात क्रमांक /जाहिरात मसुद्यातील एखादा शब्द अथवा एखादी ओळ वृत्तपत्राने जाहिरातीत प्रसिध्द न केल्यास दंड म्हणून बिलाच्या रकमेच्या १०% रक्कम संबंधित वृत्तपत्राच्या जाहिरात बिलामधून वजा करण्यात यावेत. तसा दाखला बिलामध्ये देण्यात यावा. तसेच लेखापरिक्षण आक्षेपामध्ये काही त्रुटी/ आक्षेप वसुली आढळून आल्यास संबंधित विभागप्रमुखांमार्फत त्वरित वसुली करण्यात यावी. व तसा पुर्तता अहवाल माहिती व जनसंपर्क विभागाकडे पाठवावा.

**१२)** मनपाच्या सर्व विभागा/ कार्यालयाकडून माहिती व जनसंपर्क विभागाकडे रोटेशन मिळणेकामी पत्र दिले जाते. त्यासोबत कार्यालयीन मंजूर प्रस्ताव, प्रसिध्दिसाठी द्यावयाचा मसुदा/ जाहिरात / निविदा कामे अद्ययावत माहितीसह देण्यात यावी.

सदरचे पत्र जाहिरात अपेक्षित प्रसिद्धी दिनांकापुर्वी किमान ३ दिवस अगोदर माहिती व जनसंपर्क विभागाकडे देणे आवश्यक आहे.

**१३)** नव्याने जाहिराती देणे/ मान्य धोरणात काही अडचणी निर्माण झाल्यास अगर फेरबदल करणे आवश्यक असल्यास याबाबत संपुर्ण निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

**१४)** संबंधित विभागाने वृत्तपत्रांची जाहिरात बिले नियमानुसार तयार करून माहिती व जनसंपर्क विभागाकडून तरतुद टाकून बिले अदायगीची पुढील कार्यवाही करावी. तसेच जाहिरातीचे बिले अदायगीकरिता लेखा विभागाकडे पाठवावी.

**१५)**सदरच्या रोटेशन धोरण परिपत्रकाची अंमलबजावणी आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून करण्यात यावी. तसेच पुढील वर्षाचे रोटेशन निश्चित होईपर्यंत या परिपत्रकाचा अवलंब करावा.

सही/-

**आयुक्त**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**पिंपरी - १८**